पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३२५ दिनांक - ०३/०५/२०२३**

## येरवडा पोलिस स्टेशन पुणे शहर

## रात्रीच्या वेळी मोबाईल जबरी चोरी करणारे आरोपी येरवडा तपास पथका कडुन अटक

दि.३०/०४/२०२३ रोजी सायंकाळी येरवडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना तपास पथकातील पोलीस नाईक अमजद शेख व पो अंमलदार अनिल शिंदे यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,कल्याणीनगर येथील आगाखान पुलावर एका इसमाचा जबरीने मोबाईल हिसकावून चोरी करणारे दोन इसम रेड्डी हॉटेलचे पुढे कल्याणीनगर येथे थांबलेले आहेत.

सदरची माहिती वरिष्ठांना कळवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे व अंमलदार अमजद शेख,अनिल शिंदे यांनी तेथे जावून संशयीत इसमांना पळून जात असताना अतिशय शिताफीने पकडले.त्यांना त्याचे नाव पत्ता विचारता रईस जाकीर शेख वय २१ रा बोपाडी पुणे व एक विधीसंघर्षित बालक असे असल्याचे सांगितले.त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी दि. २९/०४/२०२३ रोजी रात्रीचे वेळी आगाखान पुलावर फोन वरती बोलत थांबलेले असताना एका मुलाचा मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावले बाबत सांगून त्याबाबत कबुली दिली सदर बाबत येरवडा पोलीस स्टेशन येथे खात्री केली असता त्याबाबत येरवडा पो.स्टे.गु.र.नं.२८०/२०२३ भादवि ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल असल्याने व त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयात दि.३०/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.तसेच ताब्यात घेतलेले संशयीत इसम नामे रोहित रणवीरसिंग चिडार वय २१ रा.जयजवान नगर येरवडा पुणे व दोन विधीसंघर्षित बालक यांचेकडे अधिक तपास करता त्यांनी ब्रम्हासनसिटी वडगांव शेरी व आप्पा बळवंत चौक याठिकाणी मोबाईल चोरी केल्याचे कबूल केले आहे. सदरबाबत येरवडा पो.स्टे.येथे खात्री केली असता येरवडा पो.स्टे.गु.र.नं.२७५/२०२३ भादवि ३९२,३४ व विश्रामबाग पो.स्टे गु.र.नं.८६/२०२३ भादवि ३९२,३४ अन्वये गुन्हा दाखल असत्याने व त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयात अटक करण्यात आली आहे. असे एकूण ३ गुन्हयातील मिळून दोन मोटारसायकल व ११ मोबाईल असा एकूण १ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन एकूण ३ गुन्हे उघडकीस आणले आहेत व इतर मोबाईल बाबत तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक अंकुश डोंबाळे तपास करत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-४,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,श्री.किशोर जाधव, वपोनि येरवडा,श्री.बाळकृष्ण कदम,पोनि गुन्हे,येरवडा श्री.जयदिप गायकवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोउपनि अंकुश डोंबाळे, पोहवा गणपत थिकोळे,दत्ता शिंदे,तुषार खराडे,पोना अमजद शेख,किरण घुटे,सागर जगदाळे,कैलास डुकरे,किरण अब्दागिरे,प्रविण खाटमोडे पोअं अनिल शिंदे, राहुल परदेशी,सुरज ओंबासे,मपोअं रोहिनी भोकसे,उजाता शिरसाठ व वर्षा सावंत यांनी केलेली आहे.